दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १६५ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार, दि.१९ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# महाराष्ट्रात हिंदी भाषेची सक्ती कराल तर खपवून घेणार नाही



## राज ठाकरे यांचा सरकारला कडक इशारा

**मुंबई (विराम पवार): राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ अंतर्गत, महाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील शालेय शिक्षण पद्धतीवर मोठा वाद निर्माण झाला आहे. विशेषत:,महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) चे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निर्णयावर आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.**

राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत राज्य सरकारला कडक इशारा दिला. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदी अनिवार्य करणे हे आम्ही खपवून घेणार नाही. ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितले की, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक अस्मितेस धक्का पोहोचवणारा हा निर्णय खटला जाणार आहे.राज ठाकरे यांनी केंद्रीय सरकारच्या हिंदीकरणाच्या प्रयत्नांवरदेखील तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांचा ठाम विश्वास आहे की, हिंदीच्या प्रसाराचे प्रयत्न सर्वसामान्य लोकांच्या स्वातंत्र्यावर आणि त्यांच्या स्थानिक भाषिक अधिकारांवर आघात करतात. ठाकरे यांनी स्पष्ट केले की, हे हिंदीकरण राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. यावर मनसे पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांना सूचित केले की, राज्यातील लोकांच्या विविधतेला आणि स्थानिक भाषेला वगळून हिंदीला सक्तीने लागू करणे हे खरेच अनावश्यक आहे. राज ठाकरे यांनी सत्ताधारी सरकारवर आरोप करत म्हटले की, महाराष्ट्र राज्य त्याच्या विविधतेमुळे प्रसिद्ध आहे. इथे मराठी, उर्दू, कोंकणी, गुजराती आणि इतर अनेक भाषांचे अस्तित्व आहे. अशा राज्यात हिंदीला सक्ती करण्याचा निर्णय सर्वदूर दुर्बलतेची दृष्टी असून, या राज्याच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक संरचनेला धक्का पोहोचवणारा आहे.मनसेचे या मुद्द्यावर रवैया अगदी स्पष्ट आहे. राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मनसे पक्षाने हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रातील स्थानिक नागरिकांच्या हक्कांसाठी, तसेच राज्याच्या प्रादेशिक भाषेच्या अधिकारासाठी मनसे तत्पर आहे.राज ठाकरे यांनी केंद्र सरकारला हे कडक शब्दांत सांगितले की, राज्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेला तडा जाणार नाही, आणि तोपर्यंत मनसे आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत शांत बसणार नाही.शालेय अभ्यासक्रमाचा हा निर्णय अनिवार्य हिंदी भाषेच्या संदर्भात काही ठराविक मत असलेले शिक्षणतज्ञ आणि विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी देखील उपस्थित आहेत. अनेक विद्यार्थ्यांना ही भाषा शिकणे कठीण होईल, हे लक्षात घेता, त्यांनी या निर्णयावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच, शाळा किंवा शिक्षकांसमोर हिंदीचा अभ्यास सक्तीने करण्याची दबाव निर्माण करणे हा एक मोठा आव्हान ठरू शकतो.याआधी, राज ठाकरे यांचे केंद्र सरकार व राज्य सरकारशी संबंधित मुद्द्यांवर विविध पातळीवर विरोध होत आले आहे. या नवीन वादग्रस्त निर्णयावर त्यांची भूमिका निश्चितपणे आक्रमक आहे. ठाकरे यांनी असं सुचवलं आहे की, महाराष्ट्रातील स्थानिक मुद्द्यांना पर्यायी मार्गाने विचार केला पाहिजे. हिंदी शिकणे आवश्यक असले तरी, त्याला अनिवार्य करून त्याचा वापर करत, स्थानिक भाषेची आणि संस्कृतीची हानी होईल.राज ठाकरे यांचा मुख्य इशारा आहे की, राज्याच्या लोकशाही आणि सांस्कृतिक स्वायत्ततेला धक्का पोहोचवणारा कोणताही निर्णय मान्य केला जाणार नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेना एका मजबूत विरोधकाची भूमिका घेत, सरकारला हे सांगत आहे की, त्यांच्या राज्याच्या स्थानिक भाषिक हक्कांचे उल्लंघन कधीही सहन होणार नाही.सारांश म्हणजे, महाराष्ट्रात हिंदी भाषेची सक्ती न करता, स्थानिक भाषांना अधिक महत्त्व दिले पाहिजे, अशी ठाकरे यांची भूमिकाअसून, केंद्र आणि राज्य सरकारच्या या निर्णयावर विरोध दिवसेंदिवस तीव्र होईल, असे दिसते.

## 'लाडकी बहीण' योजनेची पडताळणी ठप्प?

# जानेवारीत अपात्र ठरवले, तरी फेब्रुवारी-मार्चमध्ये लाभार्थ्यांची संख्या वाढली; माहिती लपविण्याचे आरोप

**नागपूर । प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील अपात्र अर्जांची पडताळणी करण्याचे राज्य सरकारने जानेवारी महिन्यात जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात ही पडताळणी केवळ कागदावरच झाल्याचे चित्र समोर येत आहे. कारण जानेवारीत ज्या ५ लाख बहिणींना अपात्र ठरवून २ कोटी ४१ लाख महिलांना लाभ देण्यात आला, त्यानंतर फेब्रुवारी व मार्चमध्ये लाभार्थ्यांची संख्या वाढून २ कोटी ४७ लाखांवर गेली आहे. त्यामुळे पडताळणी खरंच झाली का? की ती थांबवण्यात आली आहे? असा सवाल उपस्थित होतो आहे.



या योजनेअंतर्गत आतापर्यंत महिलांच्या खात्यात एकूण नऊ महिन्यांचे (१,५०० रुपये प्रती महिना) अनुदान जमा करण्यात आले आहे. योजना राबवताना सरसकट अर्ज मंजूर करण्यात आले. त्यामध्ये बोगस व अपात्र अर्जांचाही समावेश असल्याची शक्यता आहे. निवडणुकीपूर्वी दोन कोटी ३४ लाख महिलांना लाभ देण्यात आला होता. योजनेच्या लोकप्रियतेमुळे महायुतीला मोठ्या प्रमाणात राजकीय फायदा झाल्याचे बोलले जाते.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीनंतर अपात्र अर्जांची पडताळणी केली जाईल, असे जाहीर केले होते. त्यानुसार जानेवारीत ५ लाख अर्ज अपात्र ठरवण्यात आले. परंतु त्यानंतरच्या महिन्यांमध्ये लाभार्थ्यांची संख्या पुन्हा वाढल्याने पडताळणीची प्रक्रिया थांबवण्यात आली की काय, अशी चर्चा सुरू झाली आहे.केसरी व पिवळी शिधापत्रिका असलेल्या, एक लाखांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांना याचा लाभ मिळतो. तर 'नमो' शेतकरी सन्मान योजनेतील १९.२० लाख लाभार्थ्यांच्या रकमेवर कपात करण्यात आली आहे. या दोन्ही घटकांव्यतिरिक्त ६० ते ६५ लाख अर्जांची पडताळणी अपेक्षित आहे. मात्र ही प्रक्रिया ठप्प असल्याने सरकारवर अतिरिक्त आर्थिक ताण येत आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये नाराजी वाढू नये, यासाठी ही पडताळणी मुद्दाम थांबवली गेल्याचे बोलले जात आहे.या योजनेविषयी माहिती अधिकारात विचारणा करण्यात आली असता संबंधित माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. मुख्यमंत्री कार्यालय व मुख्य सचिवांकडेच माहिती आहे, असे सांगून माहिती नाकारली जात असल्याचा आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष जाधव यांनी केला आहे. त्यांनी याप्रकरणी अपिलीय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.ज्या महिलांकडे चारचाकी आहे, ज्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, अशा अर्जदारांना अपात्र ठरविण्यात आले. तसेच आयकर विभागाकडून लाभार्थ्यांची माहिती अद्याप मिळालेली नसल्याने, आणखी मोठ्या संख्येने अपात्र लाभार्थ्यांचे प्रकरण उघड होण्याची शक्यता आहे. त्यामुळे योजनेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## तालुक्याच्या समस्या थेट मंत्री दरबारात

# प्रदीप वाघ यांच्या पुढाकारामुळे समाधानाची आशा



**पालघर । जितेंद्र मोरघा**

मोखाडा तालुक्याच्या दीर्घकालीन आणि मूलभूत समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी सभापती प्रदीप वाघ यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या पालघर येथील लोक दरबारात थेट निवेदन सादर केले. त्यांच्या या ठाम आणि मुद्देसूद पुढाकारामुळे तालुक्यातील प्रश्न मार्गी लागण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

प्रदिप वाघ यांनी जलजीवन मिशन अंतर्गत कामांना गती देण्याची, नळपाणी पुरवठा सुरळीत करण्याची, मोखाडा आणि खोडाळा येथे बसस्थानके उभारण्याची, अनेक गावांमध्ये बससेवा सुरू करण्याची, खोडाळा ग्रामीण रुग्णालयाच्या कामाला सुरुवात करण्याची तसेच प्रमुख रस्ते व पूल बांधकामास प्राधान्य देण्याची मागणी केली. या निवेदनावर मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच कार्यवाही केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.प्रदिप वाघ यांच्यासोबत या वेळी मोखाडा तालुका प्रमुख व नगराध्यक्ष अमोल पाटील, उपनगराध्यक्ष नवसु दिघा, विभाग प्रमुख निलेश झुगरे, संजय वाघ, नंदकुमार वाघ, नामदेव गिर्हे, राहुल झुगरे आणि महेश चोथे हे पदाधिकारी उपस्थित होते.

तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नांबाबत नेहमीच सक्रिय भूमिका घेणारे प्रदीप वाघ यांचा हा पुढाकार स्थानिक विकासासाठी महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# नेट–सेट मधून सूट प्राप्त प्राध्यापकांना मिळणार कायमस्वरूपी शिक्षक मान्यता

**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अधीसभेमध्ये नेट सेट सूट प्राप्त प्राध्यापकांना तदर्थ मान्यता प्राप्त प्राध्यापकांना कायमस्वरूपी शिक्षक मान्यता प्रदान करण्यात यावी या आशयाची मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी अधिसभेच्या सदस्यांची एक समिती गठीत करण्यात आली.



सदर समितीच्या सदस्यांनी सर्व बाजूंचा अभ्यास करून यूजीसी द्वारा नेट सेट मधून सूट प्राप्त प्राध्यापकांना कायमस्वरूपी शिक्षक मान्यता देण्यास हरकत नसल्याचे मत मांडले. परंतु विद्यापीठ प्रशासनाचा अशा प्राध्यापकांना कायमस्वरूपी शिक्षक मान्यता प्रदान करण्यास विरोध होता. या समितीमध्ये असलेल्या सदस्यांमध्ये दोन वेगवेगळी मते असल्यामुळे शेवटी हा विषय कुलगुरू यांच्यासमोर मांडण्यात आला मा. कुलगुरू यांनी सर्व समितीच्या सदस्यांना आमंत्रित करून या विषयावर परत चर्चा केली समितीमध्ये असलेल्या शिक्षक प्रतिनिधींनी कुलगुरूंना कायम स्वरूपी शिक्षक मान्यता देण्यास कोणत्याच प्रकारची कायदेशीर अडचण नसल्याचे पटवून दिले.कुलगुरूंनी देखील शिक्षक प्रतिनिधींच्या मताशी सहमत असल्याचे सांगितले.

चर्चेअंती मा. कुलगुरूंनी यूजीसीद्वारे नेटसेट मधून सूट दिलेल्या सर्व प्राध्यापकांची तदर्थ मान्यता रद्द करून कायमस्वरूपी मान्यता देण्यात यावे असे आदेश दिले. एवढेच नव्हे तर याच कालावधीमध्ये जे प्राध्यापक नेट–सेट मधून सूट प्राप्त करून घेण्यास पात्र होते परंतु काही कारणास्तव यूजीसीकडे प्रस्ताव पाठवू शकले नाही अशा प्राध्यापकांचे देखील महाविद्यालयाच्या माध्यमातून प्रस्ताव मागवावे आणि त्या प्रस्तावांची छाननी करून नेटसेट पासून सूट मिळविण्यास पात्र असल्यास त्यांचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करावे अशा आशयाचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या समितीमध्ये डॉ. देवेंद्र भोंगाडे, डॉ. अनिल दोडेवार, डॉ. श्रीकांत भोवते, डॉ. आर जी भोयर, डॉ. नितीन कोंगरे, डॉ. अजित जाचक इत्यादी सदस्यांनी प्राध्यापकांची बाजू मांडली.

# नागपूर विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथे पीठासीन अधिकारी नियुक्त

## आमदार सुधाकर अडबाले यांच्या मागणीला यश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागपूर स्थित विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी सेवानिवृत्त झाल्याने गेल्या ५ महिन्यांपासून पद रिक्त होते. रिक्त पीठासीन अधिकारी पद नियुक्त करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान उच्च शिक्षण मंत्री, अवर मुख्य सचिव यांची भेट घेऊन मागणी केली होती. त्यानुसार १७ एप्रिल २०२५ रोजी शासनाने आदेश काढून पिठासीन अधिकारी नियुक्त केल्याने मागणीला यश आले आहे.



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम–२०१६ कलम ८१ अन्वये राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणेची स्थापना करण्यात आली आहे. सदर न्यायाधिकरणाची कार्यक्षेत्र ही विद्यापीठ व संलग्नीत खाजगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सेवाविषयक याचिका व अपील याचिका यांचा निपटारा करण्याची तरतुद विषद करण्यात आली आहे. परंतु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, संत गाडगे महाराज अमरावती विद्यापीठ अमरावती व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली कार्यक्षेत्रातील नागपूर स्थित विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी दि. ३०/१०/२०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्याने गेल्या ५ महिन्यांपासून पद रिक्त होते. सदर कार्यक्षेत्रातील अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या बडतर्फ, सेवानिवृत्त कर्मचारी, निवृत्त वेतन, पदोन्नती, वेतननिश्चिती याचिका, अनेक तक्रार निवारण समिती अपील याचिका व अन्य सेवाविषयक याचिका प्रलंबित असून न्यायाच्या प्रतिक्षेत होते. त्यामुळे तात्काळ पिठासीन अधिकारी नियुक्ती करण्याची मागणी नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, अवर मुख्य सचिव श्री. बी. वेणूगोपाल रेड्डी यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. १७ एप्रिल २०२५ रोजी शासन आदेश काढून नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या पीठासीन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार न्या. श्री. बी.यु. देबडवार यांच्याकडे देण्यात आलेला आहे. त्यांच्या नियुक्तीने न्यायाधिकरणातील प्रलंबित प्रकरणे निकाली निघणार आहे. भविष्यात नियमित पिठासीन अधिकारी नियुक्ती करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार अडबाले यांनी सांगितले. न्यायाधिकरण कार्यक्षेत्रातील प्राध्यापक, शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आमदार सुधाकर अडबाले यांचे आभार मानले आहे.

# आनंद निकेतन महाविद्यालयात सलग वाचन अभियान व ग्रंथप्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय उपक्रमांचे आयोजन



**वरोरा । प्रतिनिधी**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त आनंद निकेतन महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात १४ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता सलग वाचन व अभ्यास अभियान आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य' या विषयावर तीन दिवसीय ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

उपक्रमाची सुरुवात प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अरविंद सवाने यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. यानंतर इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. अरविंद ढोके यांनी या उपक्रमामागील भूमिका विषद करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या अभियानात एकूण ५४ वाचकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये ४२ विद्यार्थी आणि १२ प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. विविध वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके, पाठ्यपुस्तके आणि संदर्भग्रंथ यांचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात सलग उपस्थिती दर्शवली. महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी चहापान व अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती.

ग्रंथप्रदर्शन १४ ते १६ एप्रिलदरम्यान ग्रंथालयाच्या वाचनकक्षात भरविण्यात आले. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर आधारित निवडक ग्रंथांचे संकलन करण्यात आले होते. या प्रदर्शनालाही विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने भेट दिली.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक प्रा. डॉ. सुधाकर पेटकर, ग्रंथपाल डॉ. संजय साबळे यांच्यासह भूपेश साखरे, सुनील चिमुरकर, अर्चना चव्हाण, प्रफुल्ल थुटे, मैनाबाई मगरे आणि ऋषिकेश वरभे यांनी विशेष मेहनत घेतली.

# आमदार करण देवतळे

## संकटाच्या वेळी माणुसकीचा दीपस्तंभ

**चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील येंसा गावाजवळ एक दुर्दैवी अपघात २८ जानेवारी २०२५ रोजी घडला, ज्यामुळे दोन कुटुंबांवर अंधार पडला. ऊसतोड कामगार महिलांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचा अडीच महिन्यांपूर्वी झालेला भीषण अपघात अजूनही अनेकांच्या स्मरणात जिवंत आहे. या अपघातात १३ महिला गंभीर जखमी झाल्या, तर दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला. बुरटकर आणि झुनझुनकर कुटुंबांतील या मातांच्या जाण्यामुळे त्यांचे मुलं अनाथ झाली. त्या कुटुंबातील जिव्हाळ्याचे व्यक्तिमत्व अचानक गमावले गेले,ज्यामुळे एक मोठा शोक आणि वेदना निर्माण झाली.**

अशा अत्यंत दुःखद प्रसंगी कुटुंबीयांना थोडासा आधार देण्यासाठी, आमदार करण देवतळे पुढे आले. केवळ शाब्दिक सहवेदना आणि संवेदना व्यक्त करणं हे फक्त छोट्या मोठ्या गोष्टी आहेत, पण त्याच्यातून केवळ माणुसकीचं दर्शन घडवणं, तेच खरे नेतृत्व असते. आमदार करण देवतळे यांनी या कुटुंबांसाठी हेच सिद्ध केलं. अपघातानंतर त्या कुटुंबाच्या अंतिमसंस्कारात स्वतः उपस्थित राहून त्यांनी तिथे असलेल्या शोकाकुल कुटुंबीयांशी थेट संवाद साधला. त्यांना केवळ आधार देणारे शब्दच नव्हे, तर एक आश्वासन दिलं - या अनाथ मुलांच्या भविष्यासाठी मी जबाबदारी घेतो.

निश्चितच, संकटाच्या वेळी दिली जाणारी आश्वासनं अनेक वेळा विस्मरणात जातात, कारण संकटानंतर वेळेची गती वेगळी असते आणि लोक गप्प होतात. परंतु आमदार करण देवतळे यांचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यांनी जे आश्वासन दिले, ते केवळ शब्दांपुरतं मर्यादित ठेवले नाही. त्यांच्या नेतृत्वाने ते कृतीत बदललं. आमदार देवतळे यांनी पुढाकार घेत थउड (वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड) अंतर्गत महालक्ष्मी कंपनीत संबंधित अनाथ मुलांना नोकरी मिळवून दिली. हे केवळ रोजगाराचं साधन नव्हे, तर त्या कुटुंबाच्या पुनर्बांधणीसाठीचा एक महत्त्वपूर्ण आणि खरा आधार ठरला.



आमदार देवतळे यांनी जे काही केले, ते केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नाही, तर एका जबाबदार सामाजिक घटकाच्या भूमिकेतून त्यांनी ते केलं. समाजातील असे लोक, जे संकटाच्या वेळी केवळ सहवेदना व्यक्त करत नाहीत, तर त्या कुटुंबांच्या जीवनात दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवून आणतात, तेच खरे जनसेवक. समाजात अशी उदाहरणे दुर्मिळ ठरत आहेत, आणि आमदार करण देवतळे यांची कृती एक आदर्श ठरली आहे.


तशाच संकटग्रस्त कुटुंबांच्या भविष्यासाठी पाऊल उचलणं आणि त्यांना आयुष्याच्या संघर्षात मदत करणं, हे केवळ सहवेदना नव्हे, तर ठाम सामाजिक बांधिलकीचं एक दर्पण आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाला आपल्या कर्तव्यातून या कुटुंबांचा आणि समाजाचा भाग बनावे लागेल. आमदार करण देवतळे यांनी या अपघातग्रस्त कुटुंबांसाठी जे काही केले, ते त्यांचे नेतृत्त्व, संवेदनशीलता आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक ठरले.

समाजातील अशा दुःखद प्रसंगांनंतर सहवेदना व्यक्त करणारे अनेक असतात. काही काळासाठी उपस्थित राहणारे, फोटोसाठी येणारेही कमी नाहीत. परंतु, संकटाच्या वेळी दीर्घकालीन आधार देणारे नेते, त्यांचं कार्य आणि नेतृत्व हे खरे महत्वाचं असतं.

आमदार करण देवतळे यांच्या या कार्याने हे सिद्ध केलं की, राजकारणी लोकप्रतिनिधी असावा लागतो, पण त्याचबरोबर माणुसकीचा ध्यास असावा लागतो. त्यांच्या कार्याने समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला की, लोकशाहीतील नेतृत्त्व केवळ राजकारणापुरतं न राहता, समाजाच्या हितासाठी कार्य करणं हे खरे नेतृत्त्व आहे.

**–संपादक**
**आशिष मारोतराव घुमे**
**९०११७०८८४०**

# मुंबईकरांचा रेल्वे प्रवास सुपरकुल ;मात्र मध्यमवर्गीयांना परवडणारा प्रवास नाही!



**बदलापूर । प्रसाद दिनकरराव**

मुंबईच्या उपनगरीय रेल्वे म्हणजे लोकल, ही मुंबईच्या जीवनवाहिन्या म्हणून ओळखली जातात. दररोज लाखो नागरिक या लोकलमधून मुंबईत आणि मुंबईतून परत उपनगरांत प्रवास करत असतात. काही महिन्यांपूर्वी, मध्य रेल्वे उपनगरीय मार्गावर एसी लोकल फेऱ्या वाढवण्यात आल्या. त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना, या लोकलच्या विरोधात काही ताणतणाव देखील निर्माण होत आहेत.

मुंबईचा एसी रेल्वे प्रवास सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय प्रवाशांसाठी परवडणारा ठरत नाही. विशेषत: बदलापूर येथून १०:४२ वाजता सुटणारी जलद लोकल, ज्याला पूर्वी नॉन एसी लोकल मानले जात होते, ती आता एसी करण्यात आली आहे. यामुळे प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत असल्याचे दिसत आहे. बदलापूरहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेने प्रवास करणारे बहुतेक प्रवासी मध्यमवर्गीय आहेत आणि काही विद्यार्थी देखील या लोकलमधून प्रवास करतात. या प्रवाशांना एसी लोकलचे तिकीट परवडणारे नाही. यामुळे त्यांना दुसऱ्या लोकलने प्रवास करावा लागतो. यावर, या लोकलने नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी विरोध दर्शविला आहे. मागील वर्षी ही १०:४२ ची लोकल एसी करण्यात आली होती. तथापि, प्रवाशांच्या विरोधामुळे ती पुन्हा नॉन एसी करण्यात आली होती. आता पुन्हा

VIA: 68km 1RT>>KYN-TNA-CLA-VDLR-SNRD

| | II | I | AC |
|---|---|---|---|
| Regular Ticket | 20 | 105 | 120 |
| 1 Month Pass | 315 | 1280 | 2385 |
| 3 Months Pass | 865 | 3475 | 6465 |
| 6 Months Pass | 1730 | 6950 | 12930 |
| 1 Year Pass | 3455 | 13895 | 25860 |
| 1 Week Pass | -- | -- | 1240 |
| 2 Weeks Pass | -- | -- | 1815 |

एकदा एसी करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासन कसा घेत आहे, असा प्रश्न प्रवासी उपस्थित करत आहेत.

**तिकिटामधील फरक**

बदलापूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या नॉन एसी लोकलचा प्रवास २० रुपये आहे.
एसी लोकलसाठी, प्रवाशांना १२० रुपये पर्यंत तिकिट मोजावे लागते.
तसेच, मानसिक पासासाठी सुद्धा मोठा फरक आहे. एसी लोकलसाठी ३१५ रुपये असलेला मानसिक पास २३८५ रुपये पर्यंत वाढला आहे.
प्रवाशांचा असा आरोप आहे की, हा प्रवास मध्यमवर्गीयांसाठी अत्यंत परवडणारा नाही. त्यामुळे, प्रवाशांची मागणी आहे की, नॉन एसी लोकल पुन्हा चालू करावी, जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक ओझे कमी होईल.

# साक्री व सतमाने येथे वंचित बहुजन आघाडीच्या फलकांचे अनावरण

## त्रिशरण आणि पंचशील स्वीकार करून कार्यकर्त्यांचे उत्साहात स्वागत



**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री शहरासह सतमाने गावात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने फलक अनावरणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. हा उपक्रम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर आणि प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष आबासाहेब खैरनार, जिल्हाध्यक्ष अरविंद निकम, उपजिल्हाध्यक्ष सिताराम वाघ, साक्री तालुका अध्यक्ष मुकुंदराव माणीक, उपतालुकाध्यक्ष नितीन मोहिते, शिंदखेडा तालुका अध्यक्ष दीपक सोनवणे, दिलीप बोरसे व सलीम पैलवान उपस्थित होते. गावातील बहुसंख्य समाज बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली.

या प्रसंगी सतमाने शाखेच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये शाखाध्यक्ष म्हणून राहुल बोरसे, उपशाखाध्यक्ष राजेंद्र निकुंभ, सचिव आकाशदीप बोरसे, खजिनदार मनोहर निकुंभ, सहसचिव देवेंद्र आखाडे तर सदस्य म्हणून राकेश बोरसे, सतीलाल आखाडे, रोहित भामरे, हिरामण जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्वांनी त्रिशरण आणि पंचशील ग्रहण करून बौद्ध मूल्यांप्रती निष्ठा दर्शवली.

# एसटी बस कुठे आहे? मोबाइल वर ठावठिकाणा कळणार

## येत्या महिन्यात सुविधा; सरनाईक यांची ग्वाही

**संपूर्ण जीपीएस बसवण्याची योजना**

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, पुढील दोन महिन्यांत एसटीच्या सर्व बसेस मध्ये जीपीएस बसवले जाईल, ज्यामुळे प्रवाशांना प्रत्येक बसच्या लोकेशन आणि वेळेची माहिती मिळणे अधिक सोपे होईल.**



**नागपूर । अनिकेत उमरेडकर**

राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाने प्रवाशांसाठी एक महत्वाची सुविधा सुरू करण्याची तयारी केली आहे. या सुविधेद्वारे, एसटी बसची लोकेशन आणि त्याची नेमकी वेळ प्रवाशांच्या मोबाइलवर दिसणार आहे. एसटी तिकिटावर असलेल्या क्रमांकाच्या मदतीने प्रवाशांना त्यांच्या बसच्या अचूक वेळेची माहिती मिळणार आहे. या सुविधेचे ॲप्लिकेशन येत्या महिन्याभरात सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर, प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटीच्या ताफ्यातील १५,००० बसांपैकी ३,००० बसमध्ये जीपीएस बसवण्याचे कंत्राट दिले होते, परंतु कंत्राटदाराच्या अपयशामुळे यामध्ये अडचणी आल्या आहेत. सरनाईक यांनी या कंत्राटदारावर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तसेच, या कामामध्ये प्रगती झाली असून सुमारे १२,००० बसेसमध्ये जीपीएस बसवण्यात आले आहे.या सुविधेमुळे एसटी प्रवास करणाऱ्या नागरिकांना अधिक सोयीचे आणि विश्वसनीय सेवा मिळणार असून, राज्यभरातील लोकल बस सेवा अधिक पारदर्शक होईल, अशी आशा आहे.

**लाइव्ह ट्रॅकिंग ॲपचा लाभ**

**हे ॲप एसटीच्या प्रवाशांना बसच्या थांब्यांची माहिती आणि येणाऱ्या बसची वेळ २४ तास आधी कळवेल. यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवाशांना प्रवासाची अचूक वेळ आणि बसच्या लोकेशनची माहिती मिळणार आहे, ज्यामुळे त्यांना ताटकळावे लागणार नाही. तसेच, बसचा ट्रिप कोड एसटी ॲपमध्ये टाकल्यावर प्रवाशांना बसच्या मार्गावर असलेल्या इतर गाड्यांची माहिती, त्या गाड्यांचे थांबे आणि वेळ देखील समजणार आहे.**

**केंद्रिय नियंत्रण कक्षाची स्थापना**

**एसटीच्या सर्व बसवर नियंत्रण ठेवण्यासाठी एसटीचे मुंबई सेंट्रल येथील मुख्य कार्यालयात अद्ययावत नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. याच्या माध्यमातून राज्यभरातील एसटी बसच्या ट्रॅकिंगवर लक्ष ठेवले जाणार आहे.**

# तीन चाकी वाहनाने खांबाला धडक दिल्यामुळे घडला वीज अपघात; महावितरणच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

## प्रकरणाला वेगळे वळण; अपघाताला कारणीभूत असलेला वाहनचालक अद्याप गुलदस्त्यात

**मोहोळ । प्रतिनिधी**

शेटफळ (ता. मोहोळ) येथे घडलेल्या वीज अपघाताच्या घटनेने आता वेगळं वळण घेतलं असून, खांबाच्या ताणाला धडक दिल्याने तारा तुटल्या असताना देखील महावितरणच्या अधिकाऱ्यांवरच गुन्हा दाखल केल्याने महावितरणच्या वर्तुळात नाराजी व्यक्त केली जात आहे.१५ एप्रिल रोजी सिद्धेवाडी शिवारात सकाळी अकराच्या सुमारास एका तीन चाकी वाहनाने (टमटम) रस्त्यालगत असलेल्या विजेच्या खांबाच्या ताणाला धडक दिली. यामुळे खडके डिपीवरील विद्युततारा तुटून शॉर्टसर्किट झाला आणि त्यातून गवताला आग लागली. ही आग विझवण्याच्या प्रयत्नात मनोज डंके या नागरिकाचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला.

या घटनेनंतर अरुण भोसले यांच्या तक्रारीवरून शेटफळ पोलीस ठाण्यात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, वाहनाने खांबाला धडक दिल्याचा, वा चालक कोण होता, याचा उल्लेख फिर्यादीत आढळत नाही.घटनास्थळी प्रत्यक्ष घडलेली बाब पाहता जर खांबाच्या ताणाला धडक दिली नसती, तर तारा तुटल्या नसत्या आणि दुर्घटना टळली असती. त्यामुळे खरा दोष वाहनचालकाचा असूनही महावितरणच्या अधिकाऱ्यांना नाहक गोवले जात असल्याचा आरोप महावितरणकडून करण्यात येत आहे.या गुन्ह्याचा सखोल तपास व्हावा, पोलिसांनी मुळ तथ्ये उजेडात आणावीत, आणि ऐकीव माहितीवर आधारित गुन्हा रद्द करावा, अशी मागणी महावितरणने केली आहे. या प्रकरणी कायदेशीर मार्गाने पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# समरसतेचा संदेश देणारी भव्य रॅली केसरीमल नगर विद्यालयाच्या वतीने संपन्न

**सिंदी (रेल्वे) | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच आगळेवेगळे व नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारे केसरीमल नगर विद्यालय, सिंदी (रेल्वे) यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समरसता रॅलीचे भव्य आयोजन केले. सदर रॅली विद्यालयापासून सुरू होऊन पंचशील बुद्ध विहार, कांढळी रोडपर्यंत संपन्न झाली.सिंदी शहरात एखाद्या शाळेकडून प्रथमच अशा प्रकारची सामाजिक सलोखा व समरसतेचा संदेश देणारी रॅली यशस्वीरीत्या पार पडली. यामध्ये विद्यालयाचे स्काऊट-गाईड पथक, इको क्लब युनिट, रोवर-रेंजर युनिट, तसेच मातोश्री सीताबाई टालाटूले प्राथमिक विद्यालय यांचा सक्रिय सहभाग होता. बँड पथकाच्या शिस्तबद्ध निनादात रॅलीने शहरात जनजागृतीचा ठसा उमटवला.

रॅलीचा समारोप पंचशील बुद्ध विहार येथे झाला, जिथे विचारप्रवर्तक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून कवडू पाटील,घनश्याम मेंढे, प्रमुख वक्ते दाढे व सातपुते यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले.शाळेचे प्राचार्य विलास एखंडे यांनी या रॅलीच्या माध्यमातून सर्वधर्म समभावाचा संस्कार विद्यार्थ्यांवर रुजवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भाषणं व भीमगीतांच्या सादरीकरणाचे पुस्तके देऊन कौतुक करण्यात आले. पंचशील बुद्ध विहाराकडून शाळेला देखील पुस्तके भेट देण्यात आली.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. कावेरी गोमासे, प्रस्तावना कु. नेहा नागरिकर व आभार प्रदर्शन कु. समिथी जगदेव (वर्ग ९वी) यांनी केले.कार्यक्रमाच्या आयोजनात सचिन मेंढे यांचे विशेष योगदान लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट अल्पोपहाराची व्यवस्था केली होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्काऊट मास्टर गिरडकर,गाईड कॅप्टन नंदनवार,इको क्लब समन्वयक श्रीमती गवारले व कोहळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.सृजनशील उपक्रमाबद्दल संपूर्ण गावकरी बांधव व नगर शिक्षण मंडळाने विद्यालयाचे व आयोजकांचे भरभरून कौतुक केले.







# मानवी जीवनशैली परिवर्तना शिवाय समृद्धी नाही-धिरेन सोनी






**सेवाग्राम | प्रतिनिधी**

पुज्य बापूंच्या पवित्र भूमीत प्रथमच येण्याची संधी लाभली, असे सांगत गुजरातचे शेती अभ्यासक धिरेन सोनी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. त्यांनी गांधीजींच्या 'पागल दौड' या लेखाचा उल्लेख करत सांगितले की, बापूंनी खूप पूर्वीच हव्यासाच्या विनाशकारी परिणामांबाबत इशारा दिला होता. आज आपण त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहोत.

आजची जीवनशैली ही नैतिकतेपासून दूर गेली आहे. प्रामाणिकतेचा अभाव, नैसर्गिक स्त्रोतांची हानी आणि हव्यास यामुळे गंभीर संकटे निर्माण झाली आहेत. यावर उपाय म्हणून पारंपरिक शेती पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे, असे मत धिरेनजींनी व्यक्त केले. त्यांनी नमूद केले की, विकासाच्या नावाखाली होणाऱ्या बदलांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे आणि ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्या गंभीर रूप धारण करत आहेत.१८ एप्रिलपासून सेवाग्राममधील 'नई तालीम समिती' आणि 'बीजोत्सव समूह' यांच्या संयुक्त विद्यमाने बीजोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटनप्रसंगी डॉ. महादेव पाचेगावकर (लातूर), पद्मश्री सुभाष शर्मा (यवतमाळ), डॉ. उल्हास जाजू आदी मान्यवर उपस्थित होते.सुभाष शर्मा यांनी हवामानातील बदल, सेंद्रिय शेती, पाणी संकट (डार्क झोन) आणि पर्यावरण हानिकारक घटकांबाबत माहिती दिली. नैसर्गिक शेतीचा अवलंब, पाण्याचे स्त्रोत संवर्धन आणि जमिनीत पाण्याचे पुनर्भरण हेच पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य समस्या, शेती संकट आणि शेतकऱ्यांची स्थिती पाहता ग्राहकांनी एकजूट होऊन चळवळ उभारावी, असा आग्रह त्यांनी धरला.डॉ. महादेव पाचेगावकर यांनीही बीजोत्सवाची गरज व महत्त्व अधोरेखित करत शेती संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'नई तालीम समिती'चे मंत्री प्रा. डॉ. प्रभाकर पुसदकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय वसंत फुंटे यांनी करून दिला. खादी वस्त्र, पुस्तके व सूतमाळेने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.या बीजोत्सवात महाराष्ट्रासह तामिळनाडू, उत्तर प्रदेश, हरियाणा इत्यादी राज्यांतील शेतकरी आणि संस्था प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

# सेवाग्राम स्थानकावर जय श्रीरामचा जयघोष; अयोध्येच्या तीर्थयात्रेला वर्ध्यातून ८०० भाविक रवाना

**वर्धा | प्रतिनिधी**

सेवाग्राम रेल्वे स्थानकावर आज दुपारी वेगळंच दृश्य पाहायला मिळालं. सामान्यतः प्रवाशांची वर्दळ, फळ विक्रेते, चहा-नाश्त्याचा गोंगाट यामुळे गजबजलेल्या या स्थानकावर दुपारपासून 'जय श्रीराम'च्या घोषणांनी परिसर भक्तिमय झाला होता. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत अयोध्येच्या दिशेने जाणारी विशेष रेल्वे आज दुपारी सेवाग्राम स्थानकावर दाखल होताच, रामभक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला.

दुपारी साधारण ३.४५ च्या सुमारास 'भारत गौरव' विशेष तीर्थयात्रा रेल्वे स्थानकावर पोहोचली. माजी खासदार रामदास तडस यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून यात्रेला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सायंकाळी ४.१५ वाजता वर्ध्यातील एकूण ८०० प्रवासी अयोध्येच्या दिशेने रवाना झाले. यामध्ये ७२९ ज्येष्ठ रामभक्त, सामाजिक न्याय विभागाचे ४६ कर्मचारी आणि ९ वैद्यकीय अधिकारी सहभागी आहेत.मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना ही राज्य सरकारने ६० वर्षांवरील सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिकांना भारतातील प्रमुख तीर्थस्थळांना मोफत दर्शनासाठी सुरू केलेली महत्त्वाकांक्षी योजना आहे. वर्धा जिल्ह्यातून या योजनेकरिता ४१६९ अर्ज प्राप्त झाले होते. याआधी ५ फेब्रुवारी रोजी १९७ भाविकांना बौद्धगया येथे पाठवण्यात आले होते. आता दुसऱ्या टप्प्यात अयोध्येसाठी मोठा जत्था रवाना झाला आहे.१८ ते २२ एप्रिल दरम्यान अयोध्या यात्रा आयोजित करण्यात आली असून यात्रेदरम्यान प्रवाशांसाठी नाश्ता, चहा, जेवण, पिण्याचे पाणी, निवास आणि रेल्वे स्थानकापासून निवासस्थळापर्यंतचा प्रवास यांची संपूर्ण जबाबदारी रेल्वे विभागाने स्वीकारली आहे.



रामभक्तांना निरोप देण्यासाठी माजी खासदार रामदास तडस यांच्यासोबत समाजकल्याण सहाय्यक आयुक्त किशोर भोयर, माजी नगरसेवक श्रेया देशमुख, भाजप नेते विरू पांडे, सालोडचे उपसरपंच आशिष कुचेवार, अमित जैन, अटल पांडे, श्रीधर देशमुख, सतीश वैद्य यांच्यासह भाविकांचे नातेवाईकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.या यात्रेमुळे अनेक रामभक्तांच्या मनातील अयोध्येला कधी जाऊ? या प्रश्नाचे उत्तर मिळाले असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान व भक्तिभाव स्पष्ट दिसत होता.राज्यभरातील एकूण २१ जिल्ह्यांमधून आजपर्यंत मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेतून १७ हजारांहून अधिक रामभक्त अयोध्येला गेले असून, ही योजना वृद्धांसाठी खरोखरच एक अध्यात्मिक समाधान देणारी ठरते आहे.

# धमक्यांना कंटाळून युवकाची आत्महत्या

## पोलीस कर्मचाऱ्यासह तिघांवर गुन्हा

**पिशोर | प्रतिनिधी**


करंजखेडा येथील सचिन आण्णाराव वाघ (वय ३०) या युवकाने १७ एप्रिल २०२५ रोजी पहाटे रामेश्वर मंदिराजवळील लिंबाच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पिशोर पोलीस ठाण्यात तेजश्री सुभाष पवार (पोलीस कर्मचारी, नागपूर कारागृह), सुभाष रावसाहेब पवार (करंजखेडा), आणि तेजश्रीचा प्रियकर (नाव व गाव अज्ञात) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या प्रकरणात मृताचे बंधू दिलीप आण्णाराव वाघ (वय ४४, रा. करंजखेडा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी संगणमत करून सचिन वाघ याला वेळोवेळी तुला पोलीस भरती वा स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊ देणार नाही, तुझे करिअर बरबाद करू, अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्या. तसेच आरोपी क्र. २ यानी १५ एप्रिल रोजी मुद्दामहून पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या सर्व मानसिक त्रासामुळे सचिन वाघने आत्महत्या केली, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०८, ३५१(३), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोउनि. विश्वजीत फरताडे करत आहेत. गुन्हा महिला पोहेकॉ. बी. बी. शिंदे यांनी नोंदविला.

# पुलगावात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरां बद्दल अभद्र टिपणीमुळे तणावपूर्ण वातावरण





**पुलगाव | प्रतिनिधी**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर अभद्र टिपणी केल्याच्या प्रकरणामुळे पुलगाव शहरात तणाव निर्माण झाला आहे. संबंधित टिपणी एका युवतीने केल्याचे समोर आले असून, या प्रकारामुळे आंबेडकर अनुयायांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणी संतप्त नागरिकांनी पुलगाव पोलीस ठाण्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहून संबंधित युवतीवर कठोर कारवाईची मागणी केली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असला तरी अद्याप तिला अटक करण्यात आलेली नव्हती, त्यामुळे नागरिकांनी नगरपरिषदेसमोरील बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत आरोपी माफी मागत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील असा ठाम पवित्रा आंदोलकांनी घेतला आहे.

दरम्यान, वर्धा येथे सदर युवतीने स्वतःहून पोलिसांसमोर आत्मसमर्पण केल्याची माहिती मिळाली आहे. पोलीस प्रशासन, सामाजिक कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील नेते शहरातील तणाव निवळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

# सोहेल बागवान यांची मंत्रालयीन लेखनिक पदावर निवड

## गावात मिरवणूक काढून उत्सव

**मोहोळ | प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत डिसेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या मंत्रालयीन टंकलेखक (ग्रुप क) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, अनगर (ता. मोहोळ) येथील सोहेल बाबासाहेब बागवान यांची मंत्रालयीन लेखनिक पदावर निवड झाली आहे. या यशामुळे गावात आनंदाचं वातावरण असून, सोहेल याची मिरवणूक काढून गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.

सोहेल बागवान यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अनगर येथे झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी सोलापूरच्या वालचंद कॉलेजमधून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले, तर बीएससी (ग्री) चे शिक्षण उदगीर येथून घेतले.

त्याच्या या यशाबद्दल सहकार परिषदेचे अध्यक्ष व माजी आमदार राजन पाटील, लोकनेते साखर कारखान्याचे अध्यक्ष विक्रांत पाटील, सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, तसेच गावातील नागरिकांनी त्याचे मन:पूर्वक अभिनंदन केले.



# दुचाकी-बैलगाडी अपघातात विद्यार्थ्याचा मृत्यू;पिशोर जवळील खडकी पुलाजवळ दुर्दैवी घटना




**पिशोर | जावेद शेख**

पिशोर-सिल्लोड रस्त्यावर खडकी नदी पुलाजवळ दुचाकीने बैलगाडीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने १६ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. जयेश माधवराव जाधव (रा. कसबागल्ली, पिशोर) असे अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जयेश जवळच्या जवखेडा (बु) येथे नात्यातील लग्नासाठी जात असताना त्याच्या दुचाकीने खडकी पुलाजवळ बैलगाडीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत बैलगाडीचा साठा दोन तुकडे झाला. जयेश गंभीर जखमी झाला होता.

घटनेनंतर जयेशला तात्काळ पिशोर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉ. सोनम जाधव यांनी त्याला तपासून मृत घोषित केले. या दुर्घटनेने पिशोर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# अनिकेत उमरेडकर यांची 'लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्था'नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**कळमेश्वर | प्रतिनिधी**

तालुक्यातील तेलकामठी गावातील सामाजिक कार्यकर्ते अनिकेत उमरेडकर यांची 'लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य' नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

ग्रामीण भागातील ग्राहकांच्या तक्रारींना वाचा फोडून न्याय मिळवून देण्यासाठी उमरेडकर यांची निवड करण्यात आली आहे. एमएसईबी, शाळा, महाविद्यालये, बँका, ग्रामपंचायती आणि इतर शासकीय कार्यालये यांच्याशी संबंधित कोणतीही ग्राहक तक्रार असो, ती नोंदवून त्यावर योग्य कार्यवाही केली जाणार आहे.

या पदाच्या माध्यमातून गोरगरिबांना न्याय मिळवून देणे आणि त्यांच्या समस्या सोडवणे हे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे. अनिकेत उमरेडकर यांचे जनसंपर्क कार्यालय तेलकामठी येथे कार्यरत असून, संपर्कासाठी मोबाईल क्रमांक ८५५१९६२७८६ उपलब्ध आहे. नागपूर जिल्ह्यातील नागरिकांनी कोणतीही तक्रार असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# ‘जलजीवन’ला साक्री तालुक्यात कासवगती!

## पाणी नाही पण ठेकेदारांची चांदी; सीईओ साहेब, किती वेळ ‘डोळेझाक’?

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यात ‘जल जीवन मिशन’ची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही फक्त कागदोपत्री प्रगती दाखवण्यासाठीचा खेळ वाटावा, अशी स्थिती निर्माण झाली आहे. गावागावांत जलजीवनच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची कामे मंजूर झाली. मात्र, गावकरी अजूनही हंडाभर पाण्यासाठी मैलोनमैल फिरत आहेत.उन्हाळा प्रखर होत चाललेला असताना पाणीटंचाईने गावांची जीवघेणी परवड सुरू आहे. राज्य सरकारने जलजीवन मिशन योजनेतून प्रत्येक नागरिकाला रोज ५५ लिटर स्वच्छ पाणी देण्याचे उद्दिष्ट ठेवले. त्यासाठी निधीही आला, कामांनाही मंजुरी मिळाली. पण जमिनीवर प्रत्यक्ष कोणतीही गती नाही. पायाभूत सुविधा, जलनलिका, साठवण टाक्या, वितरण व्यवस्था सर्वच रखडलेली!

साक्री तालुक्यात अनेक ठिकाणी जलजीवन मिशनच्या नावाखाली सुरू झालेल्या कामांची गुणवत्ता अत्यंत सुमार आहे. अनेक ठिकाणी खोदकाम झाल्यानंतर महिनोनमहिने काम थांबलेलं आहे.या कामांमधून ठेकेदारांनी फायदा कमावला, पण गावकऱ्यांना पाण्याचा एक थेंबही मिळालेला नाही.जलजीवन नव्हे, ही ठेकेदारांसाठी एटीएम स्कीम झालीय,असा संतप्त सूर गावकऱ्यांमध्ये उमटतोय.

योजनेच्या कामांची संथ गती, कामातली सुमार गुणवत्ता, ठेकेदारांची मनमानी, आणि गावकऱ्यांचे हाल हे सर्व असूनही जिल्हा परिषदेचे सीईओ विशाल नरवाडे यांनी अद्यापही कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही.दोषी ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट करण्याची आवश्यकता असताना अजूनही कागदोपत्री स्पष्टीकरण घेतले जात आहे, ही गोष्ट ग्रामस्थांच्या रोषाला खतपाणी घालत आहे.



साक्री तालुक्यातील उभंड ग्रुप ग्रामपंचायतीतील दगडी विहीर, कोळीपेठ, महाले, कुंभारदिंडणे, निमगुळ, पिंपळनेर उपसा योजना अंतर्गत गावे, अशा अनेक भागांमध्ये जलजीवन मिशनचे काम रखडलेले आहे.काही ठिकाणी काम पूर्ण झाल्याचे दाखवूनही अजून नळातून पाणी आलेले नाही.

### भाजप युवा मोर्चाचा थेट इशारा

या सगळ्या पार्श्वभूमीवर भाजप युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस राहुल राठोड यांनी आवाज उठवला आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, जल जीवन मिशनचे काम तात्काळ सुरू करा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल. गावकऱ्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहू नका!

### नागरिकांच्या प्रतिक्रिया

मागच्या वर्षी खोदकाम केलं, म्हणे दोन महिन्यांत नळ सुरू होईल... अजूनपर्यंत पाण्याचा एक थेंब नाही. – राजू मोहिते, कुंभारदिंडणे गाव

तक्रार केली तर ग्रामसेवक म्हणतो, आम्ही काही करू शकत नाही, ठेकेदाराला विचारा! – सरला वाघ, महाले गाव

निवडणूक आली की कामं सुरू, निवडणूक संपली की साईट बंद! –लक्ष्मण पाटील,दगडी विहीर गाव

### राज्यात तिसऱ्या आघाडीचा प्रयोग

# २० एप्रिल रोजी नव्या आघाडीवर शिक्कामोर्तब?

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे राजकारण युती आणि आघाडीवर सुरु झाले आहे. राज्यात शिवसेना-भाजप युती होती. त्यानंतर त्या युतीमध्ये अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आल्यानंतर महायुती झाली. महायुतीला आव्हान देण्यासाठी शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि काँग्रेस यांची महाविकास आघाडी निर्माण झाली. विधानसभा निवडणुकीपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू राजरत्न आंबेडकर यांनी मनोज जरांगे यांना सोबत घेऊन तिसरी आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो यशस्वी झाला नाही. आता राज्यातील तीन बडे नेते राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर एकत्र येत आहे. त्या नेत्यांनी तिसऱ्या आघाडीचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यावर येत्या २० एप्रिल रोजी शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांचा २० एप्रिल रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्त बच्चू कडू मोठा निर्णय घेणार आहे. राष्ट्रीय समाज पक्षाने पुण्यात युवा संघर्ष निर्धार परिषद भरवली आहे. त्यावेळी महादेव जानकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मेळाव्याच आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित राहणार आहेत. या दिवशी राजू शेट्टी आणि बच्चू कडू मोठा निर्णय जाहीर करणार आहेत.राज्यात तिसरी आघाडी निर्माण होण्याची शक्यता राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर या तिन्ही नेत्यांच्या माध्यमातून झाली आहे. हे तिन्ही नेते एकत्र येत मोठा निर्णय घेणार आहे, अशी माहिती बच्चू कडू यांनी दिली. त्यासाठी त्यांनी फुले वाड्यात येण्याचे



आवाहन सर्व कार्यकर्त्यांना केले आहे. यामुळे २० एप्रिल रोजी राज्याच्या राजकारणाचे लक्ष फुले वाडा राहणार आहे.पुणे शहरात २० एप्रिल रोजी ‘युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५’ होणार आहे. खोट्या आश्वासनांना कंटाळलेल्या तरुणांचा बुलंद निर्धार.! या टॅगलाईन खाली परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या मेळाव्यातून राज्यातील सत्ताधाऱ्यांना टीकेचे लक्ष केले जाणार आहे. राज्यात तयार होणारी ही तिसरी आघाडी प्रबळ विरोधक ठरणार का? या प्रश्नाचे उत्तर आगामी काळात मिळणार आहे.

# दाऊदी बोहरा समुदायाचे शिष्टमंडळ मोदींच्या भेटीला, वक्फ कायद्याबद्दल मानले आभार!

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

दाऊदी बोहरा समुदायाच्या शिष्टमंडळाने गुरुवारी (१७ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीमध्ये दाऊदी बोहरा समुदायाच्या प्रतिनिधींनी वक्फ सुधारणा कायद्यामुळे मोदींचे आभार मानले. बऱ्याच काळापासून बोहरा समुदायाची ही मागणी होती, असेही मत या शिष्टमंडळाने व्यक्त केले आहे. सोबतच या शिष्टमंडळाने नरेंद्र मोदी यांच्या ‘सबका साथ, सबका विश्वास’ या धोरणावर आमचा विश्वास आहे, असे मत मोदींपुढे व्यक्त केले आहे.

सध्या वक्फ सुधारणा कायद्यामुळे देशातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या कायदाला विरोधक टोकाचा विरोध करत आहेत. तर सत्ताधारी भाजपाने हा कायदा



मुस्लीम समाजाच्या हिताचे असल्याचा दावा केला आहे. मुस्लीम मसुदायानेदेखील या कायद्याला विरोध केला असून देशभरात ठिकठिकाणी आंदोलनही करण्यात आले आहे. आता वक्फ सुधारणा कायद्याला विरोध करत काही लोकांनी सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतलेली आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. असे असतानाच आता बोहरा समुदायाच्या शिष्टमंडळाने वक्फ कायद्यामुळे मोदी यांचे आभार मानले आहेत. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर आज सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान, न्यायालयाने काही अंतरिम आदेश जारी केले आहेत. वक्फ बोर्डाकडून जी संपत्ती वक्फ असल्याचे घोषित करण्यात आलेले आहे किंवा नोंदणी करण्यात आलेली आहे, त्यात कोणताही बदल करू नये. परिस्थिती जैसे थे ठेवावी, असं न्यायालयाने म्हटलं आहे. तसेच केंद्र सरकारला आपली बाजू मांडण्यासाठी एकूण सात दिवसांचा कालावधी दिला आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी ५ मे रोजी होणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बोहरा समुदायाचे खूप जुने नाते आहे. याआधीही मोदी आणि दाऊदी बोहरा समुदायाच्या प्रतिनिधींची भेट झालेली आहे. गेल्या वर्षी कतारच्या दौऱ्यादरम्यान दोहा येते मोदी यांनी बोहरा समुदायाची भेट घेतली होती. पीएम मोदी यांनी २०२३ साली मुंबईच्या दौऱ्यावर असताना माझे आणि बोहरा समुदायाचे चार पिढ्यांपासून नाते आहे, असे असे मोदी म्हणाले होते. दाऊदी बोहरा समुदाय गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. तेव्हापासून मोदी आणि या समाजाचे वेगळे नाते आहे.

## सुप्रीम कोर्टाच्या राष्ट्रपतींवरील टिप्पणीनंतर धनखड यांनी व्यक्त केली चिंता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी गुरुवारी (१७ एप्रिल) न्यापालिकेच्या भूमिकेबाबत चिंता व्यक्त केली आहे. न्यायपालिकेतील पारदर्शकता तसेच गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांचाही उल्लेख करून त्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. न्यापालिकेकडून विधिमंडळाच्या कामात होत असलेल्या कथित दखलीवरही त्यांनी बोट ठेवले आहे. अशा प्रकारच्या लोकशाहीची कधी कल्पना केली नव्हती अशी खंत त्यांनी व्यक्त केलीय.

८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने एक टिप्पणी केली होती. राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकांवर राष्ट्रपतींनी तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यायला हवा, असा सल्ला सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींना दिला होता. सुप्रिम कोर्टाच्या याच सल्ल्यावर धनखड यांनी नाराजी व्यक्त करताना न्यायपालिकेच्या कारभारावर टीका केली.आपल्याला आता अधिक संवेदनशील व्हावे लागेल. राष्ट्रपतींना कालमर्यादा ठेवून निर्णय घेण्याचा सल्ला दिला जातो. तसं न झाल्यास संबंधित विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते. अनुच्छेद १४२ हे न्यायव्यवस्थेसाठी न्यूक्लियर मिसाईल ठरत आहे. या अनुच्छेदाचा वापर लोकशाही प्रक्रियेला पाठ दाखवण्यासाठी केला जात आहे, असे परखड मत धनखड यांनी व्यक्त केले. सर्वोच्च न्यायालयाच्या कारभारावर बोट ठेवताना त्यांनी एका न्यायाधीशाच्या घरात कोटच्यवधीची रोकड सापडल्याचाही मुद्दा उपस्थित केला. मी अलिकडचेच एक उदाहरण देतो. १४ आणि १५ मार्चच्या रात्री दिल्लीतील एका न्यायाधीशांच्या निवासस्थानी एक घटना घडली. सात दिवसांपर्यंत या घटनेसंदर्भात कोणालाही समजलं नाही. हा उशीर होण्याचा नेमका अर्थ काय? असे म्हणत त्यांनी न्यायपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

### माजी आमदार संजय घाटगे, पांडुरंग बरोरा यांचा भाजपामध्ये प्रवेश

# भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष चव्हाण यांनी केले स्वागत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकसित महाराष्ट्र संकल्पनेस साथ देण्यासाठी उबाठा, काँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादीतून हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश झाला आहे. नव्याने भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमुळे भाजपा सदस्य संख्या आणखी ५० लाखांनी वाढेल असा विश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी व्यक्त केला. उबाठा गटाचे कागलचे माजी आमदार संजय घाटगे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहापूरचे माजी आमदार पांडुरंग बरोरा आणि मालेगाव येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रसाद बळीराम हिरे, श्रीरामपूर चे माजी नगराध्यक्ष संजय फंड यांचा भाजपा प्रदेश कार्यालयात पक्षप्रवेश झाला. यावेळी ते बोलत होते. श्री. बावनकुळे आणि कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत केले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील,




जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ. सीमा हिरे, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, माजी खासदार रणजितसिंह नाईक - निंबाळकर, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, अहिल्यानगर उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर आदी उपस्थित होते. यावेळी श्री. बावनकुळे म्हणाले की, कागल व शहापूर च्या माजी आमदारांच्या पक्षप्रवेशामुळे पक्षाला कोल्हापूर आणि ठाणे जिल्ह्यात बळकटी मिळणार आहे. मोठा राजकीय वारसा लाभलेले प्रसाद बळीराम हिरे आणि हजारोंच्या संख्येने भाजपामध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांमुळे नाशिक जिल्ह्यात पक्ष संघटना अधिक मजबूत होणार आहे. आरोग्य तसेच शिक्षण मंत्र्याची धुरा समर्थपणे सांभाळलेले तसेच दीर्घकाळ विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करणा-या स्व. बळीराम हिरे ह्यांच्याबद्दल आमच्या मनात नितांत आदर असून त्यांचे पुत्र आणि इतर कुटुंबियांच्या भाजपा प्रवेशामुळे आनंद झाल्याचे श्री. बावनकुळे म्हणाले. शहराच्या विकासासाठी आपण भाजपात प्रवेश करत असल्याचे श्री. हिरे म्हणाले. भाजपाचे निष्ठेने काम करून भाजपाचा झेंडा संपूर्ण नाशिक जिल्ह्यात दिमाखात फडकवू असेही त्यांनी नमूद केले. ठाणे जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते शिवाजीभाऊ देशमुख, श्रीरामपूरचे काँग्रेस नेते व माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास विहाणी यांच्यासह १२ माजी नगरसेवक, आगरी क्रांती संघटनेचे अध्यक्ष शिवाजी अधिकारी, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक इंद्रजित पडवळ, जिल्हा परिषद माजी सभापती निखिल बरोरा, फलटण चे माजी नगराध्यक्ष दिलीपसिंह भोसले, ज्येष्ठ पत्रकार रवींद्र बेडकीहाळ, तुषार गांधी, प्रसाद हिरे यांच्या पत्नी सौ. गीतांजली हिरे, नाशिक जिल्हा काँग्रेस चे उपाध्यक्ष बाजीराव निकम, रामराव शेवाळे, राजेंद्र लोंढे, अशफाक शेख, सुधाकर बाचकर यांचा भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांत समावेश आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .